वस्तू व सेवा कर प्रणालीत मुल्यवर्धित करावर आधारित उद्योगांना देण्यात येणा-या औद्योगिक विकास अनुदान संरचनेत सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक : पीएसआय-२०१७/प्र.क्र. १९७/ उद्योग-८
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १४ फेब्रुवारी, २०१८.

वाचा:- १) शासन निर्णय, उद्योग विभाग क्रमांक-पीएसआय - २०१३ / प्र.क्र.५४ / उद्योग-८, दिनांक १/४/२०१३
२) शासन आदेश उद्योग विभाग क्रमांक - पीएसआय-२०१६/प्र.क्र.२८२/ उद्योग-८, दिनांक १७/१०/२०१६

प्रस्तावना:

राज्यातील मुंबई, पुणे व ठाणे या औद्योगिक पट्टयातील उद्योगांचे विकेंद्रीकरण करण्याकरीता व राज्यातील औद्योगिकदृष्टया विकसनशील व मागास भागात उद्योग आकर्षिक होण्याकरीता तसेच त्यामधून रोजगार निर्माण व्हावा याकरीता राज्य शासनामार्फत सन १९६४ पासून राज्यात “सामूहिक प्रोत्साहन योजना” राबविण्यात येत आहे.

राज्यात सामूहिक प्रोत्साहन योजना, २००७ दिनांक १/४/२००७ ते ३१/३/२०१३ या कालावधीत राबविण्यात आली आहे. शासनाने दिनांक २२/२/२०१३ रोजी नवीन औद्योगिक धोरण-२०१३ जाहिर केले आहे. त्यानुसार सामूहिक प्रोत्साहन योजना, २००७ चा कालावधी संपुष्टात आणून दिनांक १/४/२०१३ पासून राज्यात सामूहिक प्रोत्साहन योजना, २०१३ लागू करण्यात आली आहे. सदर योजनेचा कालावधी दिनांक ३१/३/२०१८ पर्यंत आहे.

देशात दि.१/७/२०१७ पासून वस्तू व सेवा कर प्रणाली लागू करण्यात आली असून, राज्यांतर्गत विविध करांची पुनर्रचना होऊन त्यांचे एकाच करात रुपांतर झाले आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने उद्योगांकरिता सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत मूल्यवर्धित कर (व्हॅट) , केंद्रीय विक्रीकर (सीएसटी), मुद्रांक शुल्क, वीज शुल्क इत्यादी प्रोत्साहने देण्यात येतात. त्यामुळे सद्यस्थितीत केंद्रीय विक्री कर व मुल्यवर्धित कर, हे वस्तू व सेवा करामध्ये समाविष्ट झाले असल्याने मूल्यवर्धित करावर आधारित औद्योगिक विकास अनुदानाचे सूत्रामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने वस्तू व सेवा कर प्रणालीवर आधारित औद्योगिक विकास अनुदानाच्या सूत्रात बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

वस्तू व सेवा कर प्रणालीवर आधारित उद्योगांसाठी सामुहिक प्रोत्साहन योजनेतील प्रचलित विविध प्रोत्साहने कायम ठेवून केवळ मुल्यवर्धित करावर आधारित औद्योगिक विकास अनुदानात बदल करुन सुधारित सूत्र राज्य वस्तू व सेवा करावर आधारित सुधारणा करण्यात येत आहे.

१) विशाल, अतिविशाल प्रवर्गातील घटकांना द्यावयाचे औद्योगिक विकास अनुदान -

अ) सामुहिक प्रोत्साहन योजना २००१, २००७ व २०१३ अंतर्गत ज्यांना देकार पत्र दिलेले आहेत व सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ मध्ये यापुढे योजना कालावधीत द्यावयाचे देकार पत्रांना - अशा घटकांना द्यावयाची प्रोत्साहने.

i) १००% अथवा ५०% ढोबळ मुल्यवर्धित करावर आधारित घटकांकरिता सूत्र

(राज्यातंर्गत प्रथम विक्रीच्या, तालुका वर्गीकरणानुसार विहित, १००% अथवा ५०% ढोबळ (Gross) राज्य वस्तू व सेवा कर)

ii) १००% निव्वळ मुल्यवर्धित करावर आधारित देकार पत्र दिलेल्या घटकाकरिता सूत्र

(राज्यातंर्गत प्रथम विक्रीच्या, १००% निव्वळ (Net) राज्य वस्तू व सेवा कर)

ब) वरील दोन्ही परिस्थितीतील घटकांसाठी खालील अटींच्या अधीन प्रोत्साहने अनुज्ञेय राहतील.

i. सदर घटकांना वार्षिक देय एकत्रित प्रोत्साहनांची रक्कम = एकूण प्रोत्साहने भागीले एकूण अनुदान उपभोगण्याचा कालावधीच्या सरासरी एवढया मर्यादेत राहील.
ii. संबंधीत वर्षातील सरासरी पेक्षा अतिरिक्त प्रोत्साहनांची रक्कम नंतरच्या लगतच्या वर्षी अनुज्ञेय राहील.
iii. वाहन निर्मिती क्षेत्राकरीता राज्यात उत्पादित व परिवहन विभागाकडे नोंदणी झालेल्या वाहनांवरील राज्य वस्तु व सेवा करावर आधारीत औद्योगक विकास अनुदान अनुज्ञेय राहील.
iv. वेगळे बिझनेस व्हर्टिकल असल्यास इंटर युनिट ट्रान्सफरच्या पुरवठयावर वस्तु व सेवा कर लागत असला तरी त्याचा परतावा देण्यात येणार नाही.

२) मोठया प्रकल्पांसाठी चालू व नवीन द्यावयाची औद्योगिक विकास अनुदान -

(राज्यातंर्गत प्रथम विक्रीच्या, ६०% ते १००%, तालुका वर्गीकरणानुसार, निव्वळ (Net) राज्य वस्तू व सेवा कर)

३) लघु, लहान, मध्यम घटकांना द्यावयाचे औद्योगिक विकास अनुदान-

सदर प्रकल्पांना औद्योगिक विकास अनुदान खालील सूत्रांनुसार प्रस्तावित करण्यात येत आहेत

(राज्यातंर्गत प्रथम विक्रीच्या, १००% ढोबळ (Gross) राज्य वस्तू व सेवा कर)

४) कर माफी अथवा विलंबित कर दायित्त्व वर आधारित घटकांना द्यावयाचे औद्योगिक विकास अनुदान (Exemption/Deferred Tax liable Units)-

अशा घटकांना कर माफी अथवा विलंबित कर दायित्त्व स्वरुपात देय प्रोत्साहने औद्योगिक विकास अनुदान स्वरुपात रुपांतरित करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर वार्षिक औद्योगिक विकास अनुदानाचे सूत्र खालीलप्रमाणे राहील -

अ) कर माफी वर आधारित उद्योग घटकांना औद्योगिक विकास अनुदान खाली सूत्राप्रमाणे राहील.

“राज्यातंर्गत प्रथम विक्रीच्या, १००% ढोबळ (Gross) राज्य वस्तू व सेवा कर”

ब) विलंबित कर दायित्त्व वर आधारित उद्योग घटकांना औद्योगिक विकास अनुदान कर्ज स्वरुपात रुपांतरित करुन घटकास औद्योगिक विकास अनुदान खाली सूत्राप्रमाणे राहील.

"राज्यातंर्गत प्रथम विक्रीच्या, १००% ढोबळ (Gross) राज्य वस्तू व सेवा कर सदर कर्जाची परतफेड विलंबित कर दायित्त्व योजनेतील अटी व शर्तीप्रमाणे कायम राहील.

५) सदर सुधारणा दि. ०१/०७/२०१७ पासून लागू राहील.

वरील आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक १५/कराधन-१ दि.२३/८/१७, दि.१८/९/१७ व दि. ४/२/१८ च्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१४१६१५४८२२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay
Shankarrao
Ingle

Digitally signed by Sanjay Shankarrao Ingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f0d616600e4d2f510d1c8cc19813e070ad282d2275bf6fc132a2dee97f14e0a6, serialNumber=d337930b14433dc62c0154af2bbc60bb5a6edcaa66b7f34596c50a27eb0f6333, cn=Sanjay Shankarrao Ingle
Date: 2018.02.15 11:41:48 +05'30'

(संजय इंगळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. अध्यक्ष विधान सभा, विधानमंडळ सचिवालय
४. मा. सभापती, विधानपरिषद, विधानमंडळ सचिवाल
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
६. अप्पर मुख्य सचिव (कृषी), कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७. अप्पर मुख्य सचिव (वस्त्रोद्योग), सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८. प्रधान सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९. प्रधान सचिव (गृह निर्माण), गृह निर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. प्रधान सचिव (पर्यटन), पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११. प्रधान सचिव (कौशल्य विकास), कौशल्य विकास व उद्योजकता विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. प्रधान सचिव (बंदरे), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३. प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१४. विकास आयुक्त तथा संचालक (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई-३२.
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मुंबई.
१६. व्यवस्थापक, महाराष्ट्र विद्युत निर्मिती कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई.
१७. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू), मुंबई.
१८. मुख्य कार्यकारी अधिकारी, सिडको,
१९. मुख्य अधिकारी, कौशल्य विकास महामंडळ मुंबई.
२०. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (MEDA), नागपूर.
२१. अध्यक्ष, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट, नरीमन पॉइंट, मुंबई-२१.
२२. अध्यक्ष, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,
२३. सर्व उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय मुंबई.
२४. निवडनस्ती.